**परीक्षा प्राधान्य :**

क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/२०१६/3875
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :- 04/06/2016

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :-** शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जून- २०१६
उमेदवारांच्या प्रवेशपत्राबाबत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दि. १५ ते १९ जून २०१६ या कालावधीत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येत आहे. आपल्या संस्थेतून प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा प्रवेशपत्रे परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करून घेण्यात यावीत व ती संबंधित विद्यार्थ्यांना त्वरित वितरीत करावी. वितरीत करण्यापूर्वी पुढील सूचना देण्यात येत आहेत.

१. परीक्षेसाठी सादर करण्यात आलेली ऑनलाईन आवेदनपत्राच्या संख्येइतकी ऑनलाईन प्रवेशपत्रे प्राप्त झालेले आहेत का ? तपासून पहावे.

२. ऑनलाईन आवेदनपत्रावरील माहितीनुसार प्रवेशपत्रे तयार करण्यात आलेली आहेत ते तपासून पहावे.

३. पाठविण्यात आलेल्या हॉलतिकिटावर संस्थाचालक / विद्यार्थी यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात कोणताही फेरबदल करु नये, अन्यथा विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही.

४. प्रवेशपत्र वाटप झाल्यानंतर विषय, बॅच, केंद्र यामध्ये परस्पर बदल करु नये. परीक्षा केंद्रसंचालकाकडून कोणताही बदल करुन घेऊ नये किंवा बदल करून घेण्यासाठी या कार्यालयाकडे कोणताही पत्रव्यवहार अथवा दूरध्वनी करु नये. उक्त स्वरुपाचे बदल करणेसाठी प्री लिस्टमध्ये पुरेसा वेळ व संधी देण्यात आली होती. त्यामुळे प्रवेशपत्र छपाईनंतर कोणत्याही प्रकारचे बदल करण्यात येणार नाही याची नोद घ्यावी.

५. परीक्षार्थी किंवा परीक्षार्थींचे पालक यांनी या कार्यालयाशी परस्पर संपर्क करु नये याबाबतची सूचना द्यावी. परीक्षार्थींना परीक्षेच्या आवश्यक सूचना द्याव्यात.

६. कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही परीक्षार्थ्याला प्रवेशपत्रामध्ये फेरबदल करता येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

७. या कार्यालयाशी पत्र व्यवहार करताना पत्रात संपर्क माहिती ( मोबाईल क्र., ई-मेल आयडी) नमूद करणे आवश्यक आहे. अर्जासोबत आवेदनपत्राची छायाप्रत आवश्यक आहे.

८. परीक्षेच्यावेळी उमेदवाराजवळ प्रवेशपत्राशिवाय संबंधित संस्थेने दिलेले फोटो ओळखपत्र आणि पुढीलपैकी कोणतेही एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

१) मतदान ओळखपत्र
२) बँक पासबुक
३) आधारकार्ड
४) ड्रायव्हींग लायसन्स
५) पासपोर्ट
६) पॅनकार्ड

(आर. व्ही. गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१.

**प्रत :-** सर्व केंद्रसंचालक :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जून-२०१६ यांना कार्यवाहीसाठी.

E:\s\New letter\ALL GCC EXAM FILES\2016\hall ticket Letter\New Microsoft Office Word Document.docx